# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक ३०.०९.२०२६ बुधवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ३०.०९.२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश, नागपुर श्री. एम. सलमान आजमी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ३८८/२०२१ मधील, पोलीस ठाणे कपिलनगर येथील अप. क्र. १३५/२०२१ कलम ३०२ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद जावेद मोहम्मद युसुफ शेख, वय ३८ वर्षे, रा. प्लॉट क्र. १८, नवनिर्माणाधीन इमारत, कामगार नगर, कपिलनगर, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये आजन्म कारावासाची शिक्षा व प्रत्येकी १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, कामगार नगर येथील नवनिर्माणाधीन इमारतीमध्ये राहणाऱ्या महिला श्रीमती सारीका शंकर पटेल, वय ३३ वर्ष व वर नमुद आरोपी हे एकाच ठिकाणी राहत होते. महिला नामे सारीका ही शेजारी राहणाऱ्या महीला नामे शहनाज परवीन अब्दुल सत्तार शेख यांचेसोबत वारंवार व बराच वेळपर्यंत बोलायची. आरोपी हा तीचेशी का बोलतेस असे म्हणून तसेच, वारंवार बोलण्याचा राग मनात धरुन, दिनांक ३१.०३.२०२१ चे २२.०० वा. चे सुमारास, आरोपीने महिला सारीका हिचे डोक्यावर बिल्डींगचे पहिल्या माळयावरुन विट फेकुन मारल्याने, सारीका ही गंभीर जखमी झाली होती. तिला उपचारार्थ हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. अशा सरतर्फे फिर्यादी पोउपनि भरत जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपिलनगर येथे गुन्हा दाखल केला होता. आरोपींना दिनांक ०२.०४.२०२१ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. श्री. श्रीकांत संघर्षी यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती परसोडकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. चेतन ठाकुर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी सफौ. प्रकाश बारंगे व मपोहवा. प्रेरणा यांनी काम पाहिले.

**२) मा. पोलीस आयुक्त यांची डॉक्टर व वैद्यकीय संस्थाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्याची स्पष्ट भुमिका :—**

दिनांक ०२.०४.२०२१ रोजी नागपुर शहरातील विविध नामांकित व प्रतिष्ठीत रुग्णालयांचे संचालक वरिष्ठ डॉक्टर्स, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर यांचेसह वैद्यकीय क्षेत्रातील सुरक्षेच्या मुद्यांवर संवादसत्र हे मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेत पोलीस भवन येथील ऑडोटोरीयम हॉल येथे आयोजीत करण्यात आले होते. संवाद सत्राकरीता प्रमुख पाहुणे म्हणुन मा. डॉ. सचिन गाथे, अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोशियेशन, नागपुर व मा. डॉ श्रीमती मंजुषा गिरी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इंडीयन मेडीकल असोशियेशन यांची प्रमुख उपस्थिती होती. मा. सह पोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेड्डी यांनी मान्यवरांचे स्वागत करुन सवांदसत्राची प्रस्तावना सादर केली.

मा. पोलीस आयुक्त यांनी, ‘‘वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी तथा साहायक कर्मचारी यांचे सुरक्षेचा प्रश्न अंत्यत संवेदनशील असुन वैद्यकीय सेवा देणाऱ्या कोणाही व्यक्तीवर कोणताही प्रकारचा हल्ला अथवा हिंसाचार खपवुन घेतला जाणार नाही’’ अशी स्पष्ट भुमिका जाहीर केली. संवाद सत्रादरम्यान वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत यांचेवरील हल्ले रोखण्यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक योजना, रुग्णालयांमधील सुरक्षा व्यवस्था तसेच पोलीस व रुग्णालय प्रशासन यांचेतील समन्वय अधिक बळकट करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. रुग्णालय परिसरातील सुरक्षा व्यवस्था, प्रवेश नियंत्रण, सीसीटिव्ही यंत्रणा, सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, आपत्कालीन परिस्थितीत पोलीसांना तात्काळ माहिती देण्याची व्यवस्था तसेच संवेदनशील विभागातील विशेष सुरक्षा व्यवस्था याबाबतही चर्चा करण्यात आली. याकरीता विशेष: आपत्कालीन विभाग, ऑपरेशन विभाग, प्रसुति विभाग, अपघात विभाग तसेच डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी यांचा कर्तव्याचे संवेदनशील विभाग येथे अनधिकृत व्यक्तिंचा प्रवेश नियंत्रित करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. रुग्णांबाबत नातेवाईकांमध्ये निर्माण होणारा तणाव, उपचारांबाबतचे गैरसमज यामुळे उद्‌भवणाऱ्या वाद प्रसंगी परिस्थिती नियंत्रणात राहण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने रुग्णांचे नातेवाईकांशी प्रभावी संवाद साधणे व त्याद्वारे प्रभावी समुपदेशन करणे यावरही भर देण्यात आला. अचानकपणे उद्‌भलेल्या कोणताही अनुचित घटनेबाबत माहिती तात्काळ संबंधीत पोलीस ठाणे अथवा डायल ११२, नियंत्रण कक्ष यांना देण्यात यावी जेणेकरुन पोलीस यंत्रणा त्वरीत घटनास्थळी पोहोचुन परिस्थिती नियंत्रणात आणता येईल असे निर्देशही देण्यात आले.

डॉक्टर हे समाजाच्या आरोग्य व्यवस्थेचा महत्वाचा आधारस्तंभ असुन रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी कार्यरत असलेल्या रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षित व भयमुक्त वातावरण उपलब्ध करुन देणे ही पोलीस तसेच, रुग्णालय प्रशासनाची सामुहिक जबाबदारी असल्याने वैद्यकीय क्षेत्रातील कार्यरत सर्वांवरील कोणत्याही प्रकाराचा हिंसाचार सहन केला जाणार नाही असा स्पष्ट संदेश संवाद सत्रादरम्यान देण्यात आला.

संवाद सत्रामध्ये मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त श्री. दीपक अग्रवाल, श्री संदीप पखाले, मा. डॉ. सचिन गाथे, अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोशियेशन, नागपुर व मा. डॉ श्रीमती मंजुषा गिरी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इंडीयन मेडीकल असोशियेशन यांचेसह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर व पोलीस अधिकारी व अंमलदार मोठया संख्येने हजर होते. कार्यक्रमाचा समारोप करतांना आभार प्रदर्शन मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी केले.





**<u>३) सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा निरोप समारंभ संपन्न :—</u>**

दिनांक ३०.०९.२०२६ चे १७.०० वा. नागपुर पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस भवन कॉन्फरन्स हॉल येथे सप्टेंबर—२०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा निरोप समारंभ कार्यक्रम यांचे मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर अध्यक्षतेखाली तसेच, मा. श्री. राहुल माकनिकर पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) आणि मा. श्रीमती सुनिता मेश्राम, सहायक पोलीस

आयुक्त (मानव संसाधन), नागपुर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजीत करण्यात आलेला होता. सेवानिवृत्त होणारे पोलीस उपनिरीक्षक, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, कनिष्ठ लिपीक श्रेणी पदावरील पदावरील एकुण **२१** अधिकारी आणि अंमलदार यांना सपत्नीक भावपुर्ण निरोप देण्यात आला.

याप्रसंगी मा. सह पोलीस आयुक्त यांनी सर्व सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या पोलीस खात्यातील योगदानाचे कौतुक केले. तसेच, समाजात कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता सेवानिवृत्त पो. अधिकारी व अंमलदार यांनी दिलेल्या बहुमुल्य सेवेबद्दल पोलीस दलातर्फे कृतज्ञता व्यक्त केली. सेवानिवृत्तांना पुढील सुखी, समृध्द आणि निरोगी आयुष्याकरीता शुभेच्छा देवुन, निरोगी आयुष्याकरीता व्यायामाचे महत्व समजावून सांगितले. कर्तव्यदक्षतेने व प्रामाणिकपणे पोलीस दलात सेवा दिल्याबद्दल मा. सह पोलीस आयुक्त यांनी व उपस्थीत इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व सेवा प्रमाणपत्र देवुन यथोचित गौरव करण्यात आला.

सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेबद्दल बोलतांना अनेक पोलीस पाल्य व नातेवाईकांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला, ज्यामुळे निरोप समारंभस्थळी वातावरण काहीसे भावनिक झाले होते. या निरोप समारंभाचा क्षण हा आमचे कायम स्मरणात राहील अशा प्रकारची भावना सर्व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच, त्यांचे कुटुंबियांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता मा. राहुल माकनिकर पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), मानव संसाधन विभागाच्या सहा. पोलीस आयुक्त श्रीमती सुनिता मेश्राम, पोनि. श्री. अमोल इंगोले, पोहवा. श्री. रोहीत गंपावार व त्यांची टिम यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मसपोनि. श्रीमती दिपाली पाटील तथा आभारप्रदर्शन श्री. राहुल माकणिकर, पोलीस उपायुक्त, मुख्यालय, नागपूर शहर यांनी केले.





**(कामगिरी)**

**१) वाडी पोलीसांची कामगीरी :— म.को.का. चे गुन्ह्यातील पाहिजे आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे वाडी येथे अप क्र. कलम १०९,११७(२),३२४(४),३(५),१८९(२),१८९(४),१९१(२), १९१(३), भा.न्या.सं. सहकलम ४,२५ भाहका, सहकलम १३५ मपोका, सहकलम ३(१)(२),३(२),३(४) म.सं.गु. नि.का. १९९९ (मकोका) या गुन्ह्यातील एकुण ०६ आरोपींपैकी ४ आरोपींना पोलीसांनी यापुर्वी अटक केलेली आहे. गुन्हा घडल्यापासुन आरोपी टोळीप्रमुख १) कुणाल देवराव सातपुते रा. हरीओम सोसायटी, वाडी, नागपूर २) दर्पण दिपक शिंदे, रा. रघुपती नगर, वाडी, नागपूर हे दोघे गुन्ह्यात पाहिजे आरोपी होते.

गुन्हयाचे तपासादरम्यान, आरोपींचा पाठपुरावा करीत असता, वाडी पोलीसांनी तांत्रिक तपास करुन व आरोपी क्र. २ हा खांदेश परिसरात असल्याबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पाहिजे आरोपी दर्पन दिपक

शिंदे याचा धुळे, नंदुरबार व जळगांव जिल्ह्यात शोध घेतला. तो मुक्ताईनगर जि. जळगाव येथे मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. पाहिजे टोळीप्रमुख आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १) यांचे मार्गदर्शनाखाली, मा. श्री. यशवंत नलावडे, सहायक पोलीस आयुक्त, एमआयडीसी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. नितीन मगर, सपोनि कुणाल धुरट, पोउपनि. विजय नेमाडे, पोहवा रोशन फुकट, राहुल बोटरे पोअं विनोद कुंभलकर व अमित भुरे यांनी केली.

**२) <u>पोउपआ, परि क्र. ०६ कार्यालयातील पोलीस अंमलदार यांची कामगिरी :— जबरी चोरीचे गुन्ह्यातील ०२ पाहिजे आरोपींना अटक.</u>**

दिनांक ३०.०९.२०२६ चे ०१.२० वा. चे सुमारास, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपूर शहर हे त्यांचे शासकीय वाहनाने पोलीस ठाणे कोराडी हद्दीत गंभीर गुन्ह्याचे कॉल असल्याने, कोराडी येथे जात असतांना, पागलखाना चौकात एका दुचाकी वाहनावरील दोन ईसम त्यांचे ताब्यातील वाहन बेदरकारपणे चालवित असल्याने तसेच साईड देत नसल्याने, त्यांना हटकले असता, त्यांनी शासकीय वाहनासमोर त्यांची दुचाकी आणून थांबवली. सदर ईसम दारूचे अंमलाखाली असल्याने दिसून आले. त्यांचेविरूध्द ड्रंकन ड्राईव्हची कारवाई करणेबाबतचा कॉल देत असतांना, नमुद दोन्ही ईसम दुचाकीसह तेथून पळून गेले. त्यांचेवर अधिक संशय बळावल्याने त्यांचा पाठलाग केला असता, ते पासपोर्ट ऑफिस, सादीकाबाद येथील एका अरूंद बोळात शिरले. त्यामुळे शासकीय वाहनावरील चापोहवा उपेंद्रकुमार निळगुळकर व आरटीपीसी अतुल गिधाने यांनी अरूंद बोळात शिरून पळत पाठलाग करून दोघांनाही ताब्यात घेतले. सदर दोन्ही ईसमांना नाव पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे १) करण पुरूषोत्तम नौकरीया, वय ३० वर्षे २) सचिन उर्फ रामा शैलेष खरे वय १९ वर्षे दोन्ही रा. मानकापूर नागपूर असे सांगितले. आरोपींचा अभिलेख तपासला असता, दोन्ही आरोपी हे पोलीस ठाणे मानकापूर येथे दाखल जबरी चोरीचे कलम ३०९(४),३०९(६),११५(२),३५१(३),३५२, ३(५) भा.न्या.सं. या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव मानकापूर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६) यांचेसह चापोहवा. उपेंद्रकुमार निळगुळकर व आरटीपीसी पोअं अतुल गिधाने यांनी केली.

**<u>(गुन्हे)</u>**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ३०.०९.२०२६ चे ०१.२० वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खरबी चौक, देशी दारूचे दुकानासमोर एक इसम हातात शस्त्र घेवून फिरतांना दिसला. त्याचे जवळ जात असता, तो इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख इसाक उर्फे चिन्नू रमजान शेख वय २२ वर्षे रा. उस्मानिया मस्जिद जवळ, हसनबाग, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे ईमामवाडा :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०९.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे स्पर्श पांडूरंग बावणकुळे, वय २४ वर्षे, रा. स्वामी नित्यानंद मंदीरजवळ तेलीपूरा सिरसपेठ नागपूर हा त्याचा मित्र नामे शंतनु सतीश बावणे वय २४ वर्षे याचेसह ॲक्टीवा मोपेड क्र. एम एच ४९ सी के २२७८ ने घरी जात असता, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत अजनी ते मेडीकल चौककडे जाणारे रोडवरून जात असता, टी. बी. वार्ड सिग्नलवर, अज्ञात चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाचे मोपेडला जोरदार धडक मारून, मोपेडवरील दोघांनाही गंभीर जखमी करून घटनास्थळावरून पळुन गेला. फिर्यादीचा मुलगा व त्याचे मित्रास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी राजश्री पांडूरंग बावणकुळे, वय ४५ वर्षे, रा. स्वामी नित्यानंद मंदीरजवळ तेलीपूरा सिरसपेठ नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. निखिल चाफले ९७६३३९२१०२ यांनी अज्ञात आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग) महीला**

**पोलीस ठाणे जरीपटका :—** फिर्यादी प्रज्वल गणेश मानेश्वर, वय २६ वर्षे, रा. प्लॉट क्र. २१५, समता नगर, अंबाटोली गल्ली नं. ०७, जरीपटका, नागपूर यांनी पोलीस ठाण जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांची आई नामे श्रीमती आशा गणेश मानेश्वर, वय ४८ वर्षे, ह्या दिनांक २८.०९.२०२६ चे १५.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरून बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—४ फुट ६ इंच, केस—काळे लांब, अंगात— डार्क लाल रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



आशा

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. २०वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर | ३०३६९३/ २००७ | कलम ८२ सी.आर.पी. | धर्मेंद्रसिंग के. चंडाले, रा. देवीका अपार्टमेंन्ट, साकेतनगर, | ०३.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | | सी. प्रमाणे | फ्लॅट नं. १०३, स्वत:चे घर, नागपूर | |
| २ | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३३३६/ २००६ | कलम ८२ सी.आर.पी. सी. प्रमाणे | प्रकाश नत्थु टिल्लेवार, वय २९ , बिडीपेठ, सुनिल मेंढे चे घरी किरायाने, नागपूर | १२.१०.२०२६ |
| ३ | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३१४३२२/ २००८ | कलम २७९, ३३७, ३०४ (अ), ४२७ भा.दं.वि. | सुरेश देवीलाल चौधरी, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२, भवानी नगर,कळमना, नागपूर | ०८.१०.२०२६ |
| ४ | मा. २०वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५०००३ /२००० | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | १) बुधरू भक्लु मकरंदे, वय ४१ वर्षे रा. कळमना मार्केट समोरील झोंपडपट्‌टी, विजय नगर, कळमना नागपूर. २)मोठी कांताप्रसाद कुर्वे वय ३७ वर्षे, रा. प्लॉट नं. ११०, कळमना मार्केट समोरील झोपडपट्‌टी, विजय नगर, कळमना नागपूर. | ०७.१०.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**